**प्रतिवादी तर्फे उलटतपास — श्री. एस. आर. पोवार वकील.**

**७.** मी मागील दहा वर्षांपासून आजरा सूतगिरणीत नोकरीला आहे. माझे डिप्लोमा टेक्सटाईलचे शिक्षण झालेले असून मी ते इचलकरंजी येथून पुर्ण केले आहे. माझे वडिल आजरा मध्ये नोकरीला होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी वडिलांसोबत आजरा येथे राहत होतो. वादी निताच्या आईचे घर आमच्या घराला लागून आहे. ते आमचे शेजारी असल्यामुळे त्यांच्यासोबत आमचे चांगले संबंध आहेत.

८. वादी क्र.१ तिच्या आईसोबत राहते. माझे वादी व प्रतिवादींशी नातेसंबंध नाही. मला वादीकडून त्यांच्यातील न्यायालयीन प्रकरणांबाबत माहिती मिळाली आहे. माझे व वादी क्र.१ चे मैत्रीचे संबंध नाहीत. वादी क्र.१ कोणतेही काम करत नाही. मला वादी क्र.१ ने प्रतिवादीच्या विरोधात पोटगीचा अर्ज दाखल केल्याची माहिती आहे. मला तो अर्ज न्यायालयाने वादी क्र.१ च्या हद्दीपुरता पत्नी नसल्याचा निष्कर्ष देऊन रद्द केल्याची माहिती आहे.

**९.** आर्दाळ गावात माझे घर व शेती नाही. वादी क्र.१ ने मला तिची ओळखपत्रे दाखवण्याचा कोणताही संबंध नाही. मला वादी क्र.१ ने प्रतिवादी विरोधात हुंडयाबाबत दाखल केलेल्या फौजदारी प्रकरणातून त्याची सुटका झाल्याची माहिती नाही. मी गट क्र.१०७३ ची जमीन व तिचा ७/१२ उतारा पाहिलेला नाही. मी एकनाथ घोरपडे याने प्रतिवादीला विक्री केलेल्या मिळकतीची कागदपत्रे पाहिली आहेत. मी त्या व्यवहारात मध्यस्थ नव्हतो.

**१०.** मी वादी क्र.१ व संजय रामू हडलगेकरच्या दि.१०.०४.२००१ रोजीच्या विवाहा समयी हजर होतो. मला मागील ५-६ महिन्यांपूर्वी त्यांच्या घटस्फोटाचा कागद हरविल्याचे समजले आहे. मी दि.०६.०७.२०२३ रोजीचे संजय हडलगेकरचे शपथपत्र तयार केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वादी क्र.१ च्या आईसोबत चांगले संबंध असल्यामुळे तिला मदत करण्यासाठी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०४.०२.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.